जिणे चंदनाचे

पार्थ विद्या प्रसारक मंडळ

जिणे चंदनाचे

संपादक

प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे

कार्यकारी संपादक

उपप्राचार्य डॉ.शंकर चव्हाण

पार्थ विद्या प्रसारक मंडळ

जिणे चंदणाचे
Jine Chandanache

संपादक
प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे

कार्यकारी संपादक
उपप्राचार्य डॉ. शंकर चव्हाण

प्रथम आवृत्ती
२०१६

प्रकाशक/प्रकाशन
पार्थ विद्या मंडळ
पाथर्डी, जि. अहमदनगर
(सर्व हक्क - प्रकाशकाकडे)
ISBN No. 123456789

मुखपृष्ठ / रेखाटन
वसंत विटणकर
अहमदनगर

मुद्रक
गणेश आर्टस्
अहमदनगर

क्रिएशन
मोरया ग्राफिक्स
अहमदनगर

संपादकीय ...

पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त एखादा स्मृतिग्रंथ प्रकाशित व्हावा असा आमचा मानस. त्या निमित्ताने **थोर स्वातंत्र्यसेनानी, माजी आमदार ना.ग. उर्फ बाबुजी आव्हाड** या महान विभूती बद्दल दोन शब्द लिहिण्याची व संपादनाची संधी मिळाली हे माझे मी महद् भाग्य समजतो. खरे तर बाबुजींचे जीवन कार्य शब्दबद्ध करणे अशक्यप्रायच !

''पार्थ विद्या प्रसारक मंडळ'' या संस्थेला ५० वर्षे पूर्ण झाली. सुवर्ण महोत्सवी वर्षात अनेकांच्या स्वप्नांचे सोने झाले. नवीन ऊर्जा, नवा जोश घेऊन येथील तरूणाईने भविष्याकडे प्रचंड वेगाने वाटचाल सुरू केली. हा बदल, ही वेगवान वाटचाल म्हणजेच बाबुजींच्या कार्यकर्तृत्वाचा परिमल होय. जे चिरंजीव, चिरंतन, अविनाशी आहे त्याला आपण 'अमृत' म्हणतो आणि जे अखंड, अमर्याद आणि अनंत आहे त्याला 'आकाश' म्हणतो. जे स्वतः झिजून इतरांना सुगंध देते त्याला 'चंदन' म्हणतो. समाजोत्थानासाठी आयुष्यभर चंदनाप्रमाणे झिजून कर्तव्यरूपी सुगंध मागे ठेवणारे बाबुजी 'महान' होते.

समाजजीवनात वावरतांना 'त्याग' हेच गृहितक मानणाऱ्या बाबुजींनी व्यक्तिगत सुख आपल्या कार्याच्या आड येऊ दिले नाही. कम्युनिस्ट विचारांच्या प्रभावामुळे आयुष्यभर वंचितांच्या हक्कासाठी लढा दिला. गिरणी कामगारांच्या अंगावर पुरेसा कपडा नाही, जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याच्या पोटाला पोटभर अन्न नाही. हे पाहून अस्वस्थ होणाऱ्या बाबुजींनी सहकाऱ्यांच्या मदतीने एरंडगाव, भातकुडगाव वगैरे ठिकाणचे शासकीय गोदामे लुटून गोर गरीबांना धान्य वाटण्याच्या कामात अग्रक्रमाने भाग घेतला. स्वातंत्र्यानंतरही गरीबांची कुचंबणा होत आहे. हे पाहून सरकारशी दोन हात करण्यास बाबुजी कचरले नाहीत. अडाणी, अज्ञानी, समाजाला शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शिक्षण संस्था सुरू करून विश्वस्त या नात्याने चालविल्या. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अडवणूक, पिळवणूक होऊ नये, म्हणून साखर कारखान्याची उभारणी केली.

दूरदृष्टी आणि बदलत्या काळाचे भान असलेले बाबुजी म्हणूनच महान होते. त्यांच्या जीवनकार्याचा आलेख मांडत असताना ॲड. शिवाजीराव आठरे, श्री कारभारीदादा कचरे, श्री रामभाऊ दातीर, जेष्ठ विधीज्ञ ॲड. बी.ई. आव्हाड तसेच पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. अभय आव्हाड, उपाध्यक्ष, ॲड. सुरेशराव आव्हाड मित्रवर्य श्री. अविनाश मंत्री, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस.बी चव्हाण आणि माझे सर्व सहकारी या सर्वांच्या सहकाऱ्याशिवाय हा स्मृतिग्रंथ अस्तित्वात येऊ शकला नसता म्हणून सर्वांचे आभार व्यक्त करणे माझे कर्तव्य समजतो.

संपादक

डॉ. जी.पी.ढाकणे

संपादकीय ...

उभ्या महाराष्ट्रात सतत दुष्काळी तालुका म्हणून परिचित असणारा पाथर्डी तालुका. यामुळे पाथर्डी तालुक्यातील डोंगर कपारीतील झोपड्यात गरिबी आणि ज्ञानाचा गच्च अंधार दाटलेला. दरवर्षी पोटासाठी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या साखर कारखान्यावर ऊस तोडण्यासाठी जाणारे हजारो कुटूंबे, त्यामुळे ज्ञानाची बंद झालेली कवाडे कॉ.बाबुजी हे पहात होते आणि मायेच्या ममतेने अंतःकरणातून तळमळत होते. बाबुजी पक्के लढाऊ सैनिक, त्यांनी आपले अत्यंत समृद्ध, सुखी जीवन याच दीन, दलित, कष्टकरी, शेतमजूर, ऊसतोडणी कामगार यांच्यासाठी पणाला लावले.

डोंगराऐवढ्या अडचणी समोर असतांनाही या सर्वांच्या दारी ज्ञानगंगा आणण्यासाठी,'पार्थ विद्या प्रसारक मंडळाची' स्थापना केली आणि याच संस्थेचे 'जनता महाविद्यालय' सुरू केले. ध्येय एकच होते. या शैक्षणिक संकूलातून शिक्षण घेऊन जाणारा माझा विद्यार्थी साहेब झाला पाहिजे.

आज बघता–बघता संथेच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली. एका छोट्याश्या रोपट्याचे मोठ्या कल्पवृक्षांत रूपांतर झाले. बाबुजींचे स्वप्न आज पूर्णत्वास आले. या महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेली मुले आपणास सर्व क्षेत्रात अत्यंत उच्च पदावर काम करतांना आपणांस दिसतात.

कॉ. बाबुजी सतत पेरतं राहीले पण त्यांनी कापणीची कधीच आशा केली नाही. कणसात गच्च दाटलेली दाणे– नैसर्गिकरित्या तिथेच गळावीत, रूजावीत व एकाचे शंभर व्हावे. असा त्यांच्या दृष्टिकोन होता. बाबुजी फक्त तालुक्याचे नेते नव्हते तर ते उभ्या महाराष्ट्राचे नेते होते.

काही महामानवांना शंभर वर्षाचे पुढचे दिसत असते. बाबुजी त्यातीलच एक, महामानव कॉ. बाबुजींचे आयुष्य म्हणजे प्रेरणेचा स्त्रोत, त्यामुळे त्यांच्यावर जिवापाड प्रेम करणारे अनेक कार्यकर्ते जोडल्या गेले. स्वातंत्र्य लढ्यात भूमिगत असतांना अनेकदा पोलिसांचा ससेमिरा पाठीमागे लागलेला, त्यामुळे काट्याकुट्यात रहावे लागले. पण बाबुजी पक्के देशभक्त त्यांनी त्या वेदना अत्यंत हळुवारपणे आपल्या काळजात जपल्या. पक्षासाठी एकनिष्ठ असणारे बाबुजी कोणत्याही प्रलोभनाला बळी पडून दुसरीकडे गेले नाहीत. उलट शैक्षणिक सामाजिक, सहकार क्रांतीसाठी उभे आयुष्य पणाला लावले.

कॉ. बाबुर्जीच्या मध्ये असणारी संघर्षाची जिद्द, त्यांची समाजाशी जोडलेली घट्ट नाळ, उपजत कल्पक बुद्धी, दुर्दम्य आशावाद, पक्की वैचारिक बैठक यामुळेच त्यांनी पाथर्डी परिसराला सर्वांगिण दृष्टीने समृद्ध केले.

खरे तर बाबुजी माझे प्रेरणा स्रोत, माझे दैवत.

संस्थेला ५० वर्षे झाल्यानिमित्त कॉ. बाबुजींच्या सर्वांगिण कार्याची ओळख व्हावी म्हणून स्मृतिग्रंथाची निर्मिती करावी असे संस्थेचे अध्यक्ष आदरणीय अभय आव्हाड साहेब, उपाध्यक्ष आदरणीय ॲड. सुरेशरावजी आव्हाड साहेब. सर्व सन्माननीय कार्यकारीणी सदस्य यांनी ठरवले आणि याची जबाबदारी माझ्यावर सोपवली त्याबद्दल आभार न मानता शतशः आयुष्यभर त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करेल.

कॉ. बाबुजी आव्हाड या स्मृतिग्रंथाचे प्रयोजन म्हणजे, 'पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे' संस्थापक अध्यक्ष कॉ. बाबुजी, स्वातंत्र्यसेनानी बाबुजी, परिवर्तनाच्या चळवळीतील बाबुजी, शेतकरी, कष्टकरी, ऊसतोड कामगार, मजूर, दीन-दलित, यांच्यासाठी लढलेले बाबुजी, आमदार बाबुजी, विचारवंत बाबुजी, शैक्षणिक व सामाजिक चळवळीत झोकून देणारे बाबुजी, कार्यकर्त्यांसाठी झटणारे बाबुजी, शत्रुवरही मित्रासारखे प्रेम करणारे बाबुजी अशा अनेक पैलुंची नव्या पीढीला ओळख व्हावी एवढ्याचसाठी हा स्मृतिग्रंथ.

या कामी सदैव मला साथ व प्रेरणा देणारे महाविद्यालयाचे प्रायार्च डॉ. जी.पी ढाकणे साहेब यांचे मनःपूर्वक आभार. आमच्या दोघांच्या आव्हानाला साद देणारे, बाबुजींवर प्रेम करणारे त्यांचे स्नेही, मित्र, यांनी आवर्जून बाबुजींच्या बद्दल विचार शब्दबद्ध केले त्या सर्वांचे खूप-खूप आभार !

संस्थेचे अध्यक्ष आ. अभय आव्हाड साहेब, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड साहेब, संस्थेचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेशिवाय हा स्मृतिग्रंथ प्रकाशित होऊ शकला नसता त्यामुळे त्यांचे ही मनापासून आभार.

अगदी कमीत कमी वेळेत हा स्मृतिग्रंथ तयार करणारे मुद्रक 'गणेश आर्टस्' चे श्री गणेश दळवी, ज्यांनी अत्यंत आकर्षक मुखपृष्ठ आणि रेखाटने तयार केली ते महान चित्रकार वसंत विटणकर, ज्यांनी अक्षर जुळवणी केली ते भरत सुंबे, क्रिएटर किरण राऊत, मुद्रक शोधक डॉ. अशोक डोळस या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

कार्यकारी संपादक

उपप्राचार्य डॉ. शंकर चव्हाण

पार्थ विद्या प्रसारक मंडळ

अनुक्रमाणिका

अ.नं.	लेखाचे नाव	लेखकाचे नाव	पा.नं.
१	ही आग भुकेची, जळते आमच्या पोटी	श्री बाबुजी आव्हाड	१
२	कार्यकर्त्यांसाठी झटनारे बाबुजी आव्हाड	ॲड शिवाजीराव आठरे	६
३	मागे वळून पाहतांना	प्रा. के. पी. सोनावणे	१२
४	जनप्रवाहातील नेता 'कॉ. बाबुजी आव्हाड'	मा. आमदार बाळासाहेब नागवडे	१९
५	मंतरलेले दिवस	कॉ. नामदेव तात्या आव्हाड	२३
६	कॉ. बाबुजी आव्हाड : सच्चा मार्गदर्शक	काभारी दादा कचरे	२८
७	मायेची सावली मा. बाबुजी आव्हाड	ॲड. सुरेशरावजी नारायण आव्हाड	३१
८	बाबुजी आव्हाड महाविद्यालय एक ग्रामीण-संस्थात्मक आयकॉन	ॲड. अशोक शिंदे	३५
९	कॉ. ना.ग. ऊर्फ बाबुजी आव्हाड व्यक्तित्व-आणि कार्य	प्रा. डॉ. शंकर चव्हाण	३८
१०	पाथर्डी तालूक्यातील डाव्या विचाराचे-आद्य प्रवर्तक	कॉ. रामभाऊ दातीर	६८
११	आयुष्याला कलाटणी देणारे जनता महाविद्यालय	डॉ. फसले मच्छिंद्र कारभारी	७४
१२	ज्ञानयोगी	प्रा. पांडुरंग खेडकर	७८
१३	सर्वसामान्यांचा कैवारी	अविनाश मंत्री	८४
१४	धिरोदत्त नेता कॉ. बाबुजी आव्हाड	कॉ. का. वा. शिरसाठ	९१
१५	दुरदृष्टीचे बाबुजी	उमेश मोरगांवकर	९४
१६	तुफानातला दिवा : कॉ. बाबुजी आव्हाड	श्री. शरदकुमार मेढे	९७
१७	दिपस्तंभ	प्रा. रमेश मोरगांवकर	१०१
१८	जननेते बाबुजी आव्हाड यांचे भूमिगत कार्य	प्रा. दराडे संभाजी सोपानराव	१०४
१९	कर्मयोगी बाबुजी	डॉ. जी. पी. ढाकणे	११६
२०	बाबुजी आव्हाड : एक कृतिशील नेता	श्री. अशोक कानडे	१२०

ह.भ.प. श्री वामनभाऊ महाराज समवेत कॉ. बाबुजी

मा. केंद्रीय कृषी मंत्री मा.ना. शरदचंद्रजी पवार साहेब समवेत
कॉ. बाबुजी आव्हाड

कॉ. बाबुजी आव्हाड यांचे परमस्नेही श्री. आनंद शितोळे (काका)

कॉ. बाबुजी आव्हाड यांचे परमस्नेही गुलाबरावजी गडाख साहेब

विधानसभा निवडणुकी मध्ये विजयी झाल्यानंतर कार्यकर्त्यांचे आभार मानताना
मा. आमदार बाबुजी आव्हाड

मा. शरदचंद्रजी पवार साहेब कृषीमंत्री, भारत सरकार यांचे समवेत
संस्थापक अध्यक्ष ना.ग.उर्फ बाबुजी आव्हाड व सहकारी श्री सुडके गुरूजी

डावीकडून श्री. मुळे सर, किशनशेठ पटवा, किसनराव कुटे, के.पी. बारवकर, खेडकर
मध्यभागी बाबुजी आव्हाड, शिवाजीराव आठरे, प्राचार्य बी.यु. पालवे, चरेगांवकर सर

स्नेहसंमेलन प्रसंगी मा. मुख्यमंत्री मा. वसंतरावजी नाईक, समवेत बाबुजी आव्हाड आणि सहकारी

मुख्यमंत्री मा. वंसतरावजी नाईक साहेब, बाबुजी आव्हाड आणि सहकारी

तात्कालिन मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांचे समवेत मा. बाबुजी आव्हाड, ॲड. भानुदास खेडकर व मान्यवर

मा. मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेब समवेत बाबुजी स्नेहसंमेलनानिमित्त चर्चा करतांना

जिल्हा परिषद सभागृहामध्ये मा. शंकरराव काळे यांचे समवेत बाबुजी

जिल्हा परिषद सभागृहामध्ये मार्गदर्शन करताना बाबुजी आव्हाड समवेत, शंकरराव काळे व इतर पदाधिकारी

अॅड. भानुदास खेडकर, बाबुजी आणि सहकारी

मा. नामदार आण्णासाहेब शिंदे, कृषीमंत्री भारत सरकार, मा. आबासाहेब निंबाळकर, मंत्री, महा.राज्य, समवेत बाबुजी आव्हाड आणि सहकारी

जिल्हा परिषद अहमदनगर सभागृहातील एक क्षणचित्र

अहमदनगर जिल्हा परिषद बैठकीप्रसंगी मार्गदर्शन करताना मा. बाबुजी समवेत
केंद्रिय कृषीमंत्री आण्णासाहेब शिंदे, मा. आबासाहेब निंबाळकर व इतर मान्यवर.



मा. बाबुजी आव्हाड आप्तेष्ठांच्या लग्न समारंभातील एक क्षण

बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या इमारत बांधकामाची पाहणी करीत असताना मा. बाबुजी आव्हाड समवेत बी.यु. पालवे, ॲड. के.पी. बारवकर, ॲड. भानुदास खेडकर

मा. नामदार श्री. वसंतराव नाईक, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या समवेत मा. बाबुजी आव्हाड

मा. शंकरराव काळे साहेब मार्गदर्शन करतांना समवेत मा. आमदार बाबुजी आव्हाड व मान्यवर

वृक्षारोपन करीत असताना थोर स्वातंत्र्य सेनानी माजी आमदार स्व. ना.ग. उर्फ बाबुजी आव्हाड साहेब

पद्मश्री विखे पाटील, आबासाहेब निंबाळकर, लक्ष्मणराव पालवे यांच्या समवेत कॉ.बाबुजी



कॉ. बाबुजी आव्हाड करंजी येथील शेतकरी कष्टकरी कामगार परिषदे समोर भाषण करीत असताना हजारोंनी जमलेला जनसमुदाय



कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बाबुजी आव्हाड

जनता महाविद्यालयाच्या विकास आराखड्याचे निरिक्षण करताना मा. बाबुजी आव्हाड

पदमश्री विखे पाटील, माधवराव निऱ्हाळी, शिवाजीराव आठरे पा. यांचे समवेत बाबुजी

बाबुजी आव्हाड कृतज्ञता सोहळ्याचे दिपप्रज्वलन करतांना थोर विचारवंत
विधानपरिषद सभापती
मा. बाळासाहेब भारदे व सहकार महर्षि लोकनेते आ. मारूतरावजी घुले पाटील

श्री. बाबुजी आव्हाड यांना पाथर्डी करांच्या वतीने कृतज्ञता सोहळ्यानिमित्त मानपत्र देताना मा.श्री. आनंद शितोळे(मध्यप्रदेश) समवेत श्री. बाळासाहेब भारदे व श्री. मारूतराव घुले पा.

थोर स्वातंत्र्य सेनानी कॉ. बाबुजी आव्हाड स्मृतीग्रंथ प्रकाशन प्रसंगी
मा.ना. दिलीप वळसे पाटील यांचे स्वागत करतांना मा. अभय आव्हाड समवेत मा.ना.
बबनरावजी पाचपुते साहेब, मा. खासदार रणजितसिंह मोहिते पाटील ,
मा. आ. नरेंद्र घुले पाटील, मा.आ. शिवाजीराव कर्डीले साहेब,
मा.आ. चंद्रशेखर घुले साहेब, संस्थेचे उपाध्यक्ष, ॲड. सुरेशरावजी आव्हाड साहेब

महाविद्यालय इनडोअर स्टेडिअमचे उद्घाटन प्रसंगी मा. नामदार सौ. पंकजाताई मुंडे, मा. नामदार प्रा. राम शिंदे संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड, डॉ. गर्जे व इतर मान्यवर.

मा.ना. पंकजाताई मुंडे यांचे सत्कार करतांना मा. अभय आव्हाड समवेत गृहराज्य मंत्री प्रा. राम शिंदे, आमदार मोनिकाताई राजळे व इतर मान्यवर.

महाविद्यालयाच्या इनडोअर स्टेडियमच्या उद्घाटक प्रसंगी स्वागत करतांना संस्थाध्यक्ष मा. अभय आव्हाड, व्यासपिठावर मा.ना. पंकजाताई मुंडे, मा.आ. दगडु पा. बडे

मा. नामदार दिलीप वळसे यांचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे समवेत, मा.अभय आव्हाड

महाविद्यालयास सदिच्छा भेटीसमयी मनोगत व्यक्त करताना मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील व मंचावर उपस्थित मान्यवर मा. अभय आव्हाड, ना. सौ. शालिनीताई विखे पाटील

महाविद्यालयाच्या ग्रंथालयास सदिच्छा भेट देताना मा.आ. डॉ. सुधिर तांबे, मा. शिवशंकर राजळे

बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील मुलींच्या वसतिगृहाचे भुमीपुजन प्रसंगी जि.प. उपाध्यक्ष मा. राजेंद्र फाळके, समवेत अभय आव्हाड, मा. सी.डी. फकिर साहेब व इतर मान्यवर

महाविद्यालाच्या ग्रंथालयास सदिच्छा भेट देताना मा. आमदार उषाताई दराडे व ग्रंथपाल पांडूरंग खेडकर

संस्थेचे अध्यक्ष मा. अभय आव्हाड यांची सा.फु. पुणे विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, यासमवेत प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे

महाविद्यालयास सदिच्छा भेटीप्रसंगी डॉ. बा.आ.म. विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ. नागनाथ कोतापल्ले, प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे, उपप्राचार्य डॉ.एस.बी. चव्हाण व डॉ. अशोक कानडे

राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उदघाटन प्रसंगी स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ. सर्जेराव निमसे, ॲड. शिवाजीराव आठरे, मा. कारभारी दादा कचरे व इतर मान्यवर

मा.डॉ. नरेंद्र कडु सहसंचालक उच्च शिक्षण पुणे विभाग यांचे स्वागत करताना मा.श्री. अभय आव्हाड

डॉ. नरेंद्र कडु, सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे, संस्थेचे अध्यक्ष श्री अभय आव्हाड चर्चा करतांना

पर्यावरण कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मा. पोपटराव पवार, मा. अभय आव्हाड मा. उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड व इतर मान्यवर.

नॅक कमिटीचे सदस्य डॉ. के.आर. प्रभाकर, डॉ. विजया लक्ष्मी समवेत मा. अभय आव्हाड, उपाध्यक्ष, ॲड. सुरेशराव आव्हाड, प्राचार्य जी.बी. आघाव व महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद.

प्रथम नॅक मानांकन प्राप्त झाल्यानंतर साजरा केलेला आनंदोत्सव.

नॅक पुनर्मूल्यांकनचा अहवाल मा. प्राचार्यांना सादर करताना नॅक कमिटीचे अध्यक्ष, डॉ. एस. जयराम रेड्डी, डॉ. एम. विमला आणि डॉ. हरिदवार सिंग समवेत मा. अभय आव्हाड

नॅक पुनर्मूल्यांकन कमिटीचे सदस्य व महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद.

मा. महेशजी भागवत, आय.पी.एस. व संस्थेचे अध्यक्ष, मा.श्री. अभय आव्हाड

मा. महेश भागवत, आय.पी.एस. अधिकारी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना समवेत संस्थेचे अध्यक्ष, मा. अभय आव्हाड, डॉ. देशमुख, डॉ. गर्जे व उपप्राचार्य, एस.बी. चव्हाण

आय.ए.एस. उत्तीर्णंचा सत्कार करताना मा. अभय आव्हाड समवेत ॲड. बी.ई. आव्हाड

आय.ए.एस. अधिकारी परीक्षा उत्तीर्ण झाल्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
ॲड. बी.ई. आव्हाड, समवेत मा. अभय आव्हाड व सत्कार मुर्ती

महाविद्यालयाच्या संगणकीकृत ग्रंथालयाचे उदघाटन करतांना ज्येष्ठ विविज्ञ ॲड. बी.ई. आव्हाड समवेत संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. अभय आव्हाड

मोफत इंटरनेट सेवेच्या लाभ घेताना महाविद्यालयीन विद्यार्थी

युवक महोत्सव उदघाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. संजीवकुमार दयाळ सोबत संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड, प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे

जिल्हाधिकारी मा. अनिल कवडे यांचे स्वागत करतांना संस्था अध्यक्ष मा. अभय आव्हाड

स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रीय छात्रसेनेच्या कॅडेटसमवेत संस्थाध्यक्ष मा. अभय आव्हाड, प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे, एन.सी.सी. अधिकारी प्रा. डी.डी. पालवे

१७ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अहमदनगर जिल्ह्यातील गुणवंत छात्रांचा सत्कार करताना कर्नल शशीकांत जाधव, मा. अभय आव्हाड व इतर मान्यवर

शैक्षणिक सहलीदरम्यान पुणे विद्यापीठातील एक क्षणचित्र

विद्यापीठ परिचय सहल प्रसंगी विद्यार्थ्यांसमवेत संस्थाध्यक्ष व सिनेट सदस्य मा. अभय आव्हाड व प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे

विद्यापीठ भेटी दरम्यान मा. अध्यक्ष आव्हाड साहेबांच्या समवेत विद्यार्थी

जयकर ग्रंथालयास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या भेटीप्रसंगीचा एक क्षण.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव करताना मा.श्री. अभय आव्हाड प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे व उपप्राचार्य, डॉ. एस.बी. चव्हाण

पठाणकोट (पंजाब) येथे झालेल्या पॉवर लिफ्टींग स्पर्धेत कास्यपद पटकविल्याबद्दल देविदास ठोंबरे यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष, मा. अभय आव्हाड

स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाविद्यालय परिसर स्वच्छता करताना विद्यार्थी

स्वच्छ भारत अभियानांतर्गत बस स्थानकाची स्वच्छता करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी

विभागीय फुटबॉल स्पर्धेतील एक क्षण

बाबुजी आव्हाड महाविद्यालय आयोजित विभागीय भारत्तोलन स्पर्धेतील एक रोमांचक क्षण

वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी सिनेअभिनेत्री प्रतिक्षा लोणकर, संस्थेचे अध्यक्ष मा. अभय आव्हाड, उपाध्यक्ष, ॲड. सुरेशराव आव्हाड

वर्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सिनेअभिनेते अविनाश खर्शीकर, सोबत अभय आव्हाड व इतर मान्यावर

ज्ञानेश्वरी प्रवचन सोहळा प्रसंगी ह.भ.प. डॉ. नामदेव शास्त्री यांचे स्वागत करताना
मा. अभय आव्हाड

ज्ञानेश्वरी प्रवचनात तल्लीन श्रोतृ वृंद

महाविद्यालयाच्या प्रांगणांमध्ये भारतीय स्टेट बँक शाखा पाथर्डीचे प्रबंधक मा. रगडे साहेब व स्टाफ वृक्षारोपण करताना

पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपन करताना प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे, प्रा.डॉ. सुभाष शेकडे, प्रा. डॉ. अजयकुमार पालवे, प्रा.डॉ. अशोक डोळस व इतर

महाविद्यालयच्या प्रांगणात सत्संग कार्यक्रमाच्या भूमिपुजन प्रसंगी प्रज्ञाचक्षू मुकूंदकाका जाटदेवळेकर व मा. अभय आव्हाड.

इनडोअर स्टेडिअमचे भूमिपुजन करताना संस्थेचे अध्यक्ष मा. अभय आव्हाड व इतर पदाधिकारी

सेवानिवृत्त कर्मचारी प्रा. पाखरे यांचा सपत्निक सत्कार करताना मा. अभय आव्हाड व प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे

सेवानिवृत्त कर्मचारी श्री. भानुदास रासकर यांचा सपत्निक सत्कार करताना मा. अभय आव्हाड व प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे

जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीभ्रुण हत्येविरोधात जनजागृती महिला मेळावा

स्त्रीभ्रूण हत्येविरोधात नृत्याच्या माध्यमातून जनजागृती

सामाजिक उपक्रम हळदी कुंकू कार्यक्रमात सौ. कविताताई आव्हाड

महिला पालक मेळावा व हळदी कुंकू कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना सौ. सविता रोडी-शेळके मचांवर उपस्थित सौ. कविताताई आव्हाड व इतर मान्यवर

बाबुजी आव्हाड स्मृती व्याख्यानमालाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे, मंचावर उपस्थित डॉ. कुमार सप्तर्षि, मा. अभय आव्हाड व इतर मान्यवर

बाबुजी आव्हाड स्मृती व्याख्यानमालेच्या उदघाटन प्रसंगी कॉ. गोविंद पानसरे व संस्थाध्यक्ष, मा. अभय आव्हाड व इतर मान्यवर

बाबुजी आव्हाड स्मृती व्याख्यानमालेत पहिले पुष्प गुंफतांना पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने

बाबुजी आव्हाड स्मृती व्याख्यान मालेचे उद्घाटक पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांचा सत्कार करताना
मा. अभय आव्हाड व इतर मान्यवर

दिपावली निमित्त तेजोमय महाविद्यालय

दिपावलीच्या पूर्वसंध्येला दिपोत्सोवासाठी उपस्थित महाविद्यालयाचा स्टाफ

पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा.ना.ग. उर्फ बाबुजी आव्हाड यांच्या अर्धाकृती पुतळा

महाविद्यालयात प्रार्थनेसमयी शिस्तबद्धपणे उभे असलेले विद्यार्थी

भगवान गडाचे मठाधिपती, डॉ. नामदेव शास्त्री व संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. अभय आव्हाड चर्चा करतांना

पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त ज्ञानेश्वरी प्रवचन सोहळ्यापूर्वी पार्थ नगरीतून काढलेली भव्य दिंडी.

संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त बुक फेस्टिवल सभामंडपाचे प्रवेशद्वार

बुक फेस्टिवल उदघाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. अभय आव्हाड
मा. प्रकाश महाजन यांचे स्वागत करतांना

मा. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पुतळ्याचे अनावरण करतांना
मा. प्रकाश महाजन, मा. अभय आव्हाड व इतर मान्यवर

बुक फेस्टिवल निमित्त ग्रंथ दिंडीचे आयोजन

ग्रंथ दिंडीतील एक अविस्मरणीय क्षण

ग्रंथ दिंडीतील बार्शी येथील सहभागी बाल वारकरी

ग्रंथ दिंडीतील सहभागी महाविद्यालयातील विद्यार्थींनी

ग्रंथ दिंडीच्या मिरवणुकीत श्री विवेकानंद विद्या मंदिरचे विद्यार्थी

ग्रंथ दिंडीच्या मिरवणुकीत प्रात्याक्षिके दाखवताना श्री विवेकानंद विद्या मंदिरचे विद्यार्थी

बुकफेस्ट मध्ये आनंद लुटताना विद्यार्थींनी

बुक फेस्टच्या प्रांगणातील वन्या प्राण्यांच्या शिल्पा बरोबर खेळतांना विद्यार्थी

बुक फेस्टीवल मध्ये सहभागी सर्व प्रकाशक
संस्थाध्यक्ष मा. अभय आव्हाड यांचा सत्कार करतांना

ग्रंथ दिंडीच्या मिरवणुकीत प्रात्याक्षिके दाखवताना श्री विवेकानंद विद्या मंदिरचे विद्यार्थी

सायंकाळच्या वेळी महाविद्यालयाच्या मुख्य रस्त्याचे विहंगम दृष्य

पार्थ विद्या प्रसारक मंडळ